सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027
# ग्लोबल महातेज
https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192
वर्ष १ ले | अंक : २०७ | रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. साहेबराव धोंडू पाटील**
माजी आमदार, अमळनेर



**सौ. शुभांगी धनंजय सोनार**
अमळनेर

## अक्षय्य तृतीयानिमित्त बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह सतर्कता अभियान

### धर्मगुरू पुरोहित संघ, अमळनेर पोलिस व आधार संस्था यांनी घेतला पुढाकार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बालविवाह विरोधात सतर्कता अभियान धर्मगुरू पुरोहित यांच्या सहाय्याने राबविण्यात येत आहे.अक्षय तृतीया मुहूर्तावर विवाह होतील त्यामध्ये विशेषता मुला मुलींचे वय हे पडतळण्यात यावे तसेच दोघांचे आधार कार्ड, शाळेचा दाखला व जन्म दाखला बघूनच मुहूर्त सुचवावे असे आवाहन करण्यात आले. जळगाव जिल्हाधिकारी मा. रोहन घुगे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी ऋषिकेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमळनेर पोलीस स्टेशन व आधार बहुउद्देशीय संस्था यांनी मिळून अमळनेर येथील पुरोहित संघ यांची पंचायत समिती साने गुरुजी सभागृहामध्ये मीटिंग घेतली .यावेळी अमळनेर शहरातील पोलीस स्टेशनच्या पीएसआय कविता ठाणगे यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा व पोस्को अॅक्ट बद्दल माहिती दिली. बालविवाह घडवून आणल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे सूचित केले. यावेळी पोलिस कॉन्स्टेबल शामल पारधी यांची उपस्थिती होती.आधार संस्था संचालक रेणू प्रसाद यांनी बालविवाह बद्दल व बाल तस्करी ,लैंगिक शोषण, बालकामगार यावर माहिती सांगितली. हे अभियान जिल्ह्यात देखील सतर्कतेने राबविले जावे या संदर्भात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री ऋषिकेश काळे यांच्यासोबत चर्चा करण्यात आली.आधार बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष डॉ.भारती पाटील, संचालक रेणू प्रसाद, जस्ट राईट फॉर चिल्ड्रन प्रकल्प समन्वयक आनंद पगारे, मोहिनी धनगर, दीपक विश्वेश्वर, उर्जिता शिसोदे, दीप्ती गायकवाड, अश्विनी भदाणे, भावना सूर्यवंशी सहभागी झाले.पुरोहित संघाचे निलेश जोशी, श्रीकांत पाठक, हरिश्चंद्र जोशी, प्रफुल जोशी, अरविंद नाईक, अक्षय नाईक, ज्ञानेश्वर भावे, प्रदीप कुमार जोशी, प्रशांत जोशी, महेश कुलकर्णी, नंदकुमार जहांगीदार, सुनील जोशी, सारंग गर्गे, मंगेश काळकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.




*अमळनेर : बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह सतर्कता अभियान राबविताना धर्मगुरु पुरोहित संघ, पोलीस व आधार संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी.*

## बाजार फुलला...!





*अमळनेर : अक्षय्य तृतीया अर्थात आखाजीच्या पूर्वसंध्येला श्री मंगळग्रह देवतेभोवती करण्यात आलेली आंब्यांची आकर्षक सजावट. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)*

## साडेतीन मुहूर्तापैकी एक; आज अक्षय्य तृतीया

### या दिवशी केलेले काम देते अक्षय फळ, सकारात्मक ऊर्जा आणि मन:शांती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सर्वत्र अक्षय्य तृतीयेचा सण साजरा केला जाणार आहे. हिंदू धर्म आणि मराठी परंपरेनुसार अक्षय्य तृतीया हा साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्त मानला जाता. या दिवशी केलेले दान, जप, तप किंवा नवीन सुरूवात दीर्घकाळ टिकते, अशी श्रद्धा आहे. 'अक्षय' या शब्दाचा अर्थ कधीही न संपणारे, असा असल्याने या दिवशी केलेल्या शुभ कार्यांचे फळ कायम वाढत राहते, अशी मान्यता आहे.

**साडेतीन मुहूर्त म्हणजे काय?**

मराठी संस्कृतीत वर्षातील काही निवडक दिवस अत्यंत शुभ मानले गेले आहेत. ज्यांना 'साडेतीन मुहूर्त' असे म्हटले जाते. या दिवसांमध्ये कोणतेही शुभ कार्य करण्यासाठी वेगळा मुहूर्त पाहण्याची गरज भासत नाही. कारण संपूर्ण दिवसच शुभ मानला जातो.साडेतीन मुहूर्तामध्ये गुढीपाडवा, अक्षय तृतीया, विजयादशमी (दसरा) हे तीन पूर्ण मुहूर्त मानले जातात, तरदिवाळी पाडवा हा अर्धा मुहूर्त मानला जातो. त्यामुळे या चार दिवसांना एकत्रितपणे 'साडेतीन मुहूर्त' असे संबोधले जाते. हे दिवस नवीन सुरूवात, गुंतवणूक, खरेदी किंवा कौटुंबिक मंगल कार्यांसाठी विशेष शुभ मानले जातात. त्यामुळे अनेकजण या दिवसांची आतुरतेने वाट पाहतात.

**अक्षय्य तृतीया इतकी शुभ का मानली जाते?**

अक्षय्य तृतीया हा दिवस समृद्धी, स्थैर्य आणि नवीन सुरुवातींचे प्रतीक मानला जातो. धार्मिक मान्यतेनुसार या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची पूजा केल्यास घरात सुख-समृद्धी वाढते. तसेच या दिवशी केलेले दान-पुण्य अनेक पटींनी वाढते, अशी श्रद्धा आहे. अक्षय्य तृतीया हा साडे तीन मुहूर्तापैकी एक असल्याने या दिवशी नवीन व्यवसाय सुरू करणे, दुकान उघडणे किंवा एखाद्या नवीन प्रोजेक्टची सुरूवात करणे शुभ मानले जाते. अनेकजण या दिवशी सोने-चांदी खरेदी करणे किंवा

पान २ वर



### स्त्रियांनी हळदी-कुंकू समारंभ करणे मानले जाते शुभ

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी कोणतेही नवीन काम सुरू करण्यास मुहूर्त पाहण्याची गरज नाही. हा दिवस पितरांचा सण आहे म्हणून या दिवशी दुपारी १२ वाजेनंतर पितरांना अन्नाचा नैवेद्य करावा. घरातील सर्वांनी दक्षिणेकडे तोंड करून, हात जोडून पितृस्तुती म्हणावी. या दिवशी केळीचे पूजन करताना खाली गहू ठेवणे. या दिवशी पितरांना उदककुंभदान करतात. पत्रावळीवर तांदूळ ठेवून त्यावर पाण्याने भरलेला मृत्तिका घट ठेवावा. त्यात गंध, फुले, तीळ, सुपारी, विड्याची पाने, दक्षिणा, पाणी घालावे. घटास सूत्राचे वेष्टन करावे. घटाची पंचोपचार पूजा करून तो दान द्यावा. या दिवशी केलेले दान, हवन, तर्पण, पूजा, जप इत्यादी पुण्यकर्म अक्षय्य टिकते म्हणून 'अक्षय्य तृतीया' ही शुभतिथीप्रमाणे पितृतिथीही आहे. पितरांचे ऋण फेडण्याचा हा दिवस आहे. या दिवशी गंगास्नान, यज्ञहोम, यवदान, यवभक्षण करावे. पार्वती मातेचा उत्सव सांगता समारंभनिमित्ताने सर्व स्त्रियांनी हळदी-कुंकू समारंभ करावयाचा असतो.




## सन आखाजीना!

खानदेसम्हाना माहेरवाशिनीसना पहिला सन. त्यामुये यानी अख्खा खानदेसम्हा न्यारीच चर्चा ऱ्हास बरं! आखाजी आनि खानदेसनं येगळचं नातं शे. साडेतीन मुहूर्तांना हाऊ एक सन शे. म्हनीसनी खानदेसनी गवराईना सनभी भलताच न्यारा. माहेरवाशिनी झाडले झोका बांधतीस आनि मजामा गवराईना अख्खा याय गानं म्हनतीस

आते तुमेन गानं ऐकाच!

**नदीकाठनी चिकनी माटी, तिना वट्टा बांधू दे ।**
**हाऊ वट्टा चांगला ते, त्याव्हर घट्या मांडू दे ।।**
**हाऊ घट्या चांगला ते, त्याव्हर सोजी दऊ दे ।**
**हाई सोजी चांगली ते, तिना लाडू बांधू दे ।।**
**हाऊ लाडू चांगला ते, संकरजीले धाडू दे।।**

**- सौ. मिराबाई दिलीप बहिरम,** अमळनेर.

गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
**जय स्वदेशी...!!**

## आमरसात दूध, तूप योग्य की अयोग्य?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आमरसात अनेकजण दूध, तूप घालणे विसरतात. मात्र, त्यात दूध, तूप घालणे किती महत्त्वाचे आहे, हे आपल्याला माहीतच नाही. तर ते कसे महत्त्वाचे आहे, ते जाणून घेऊया. आमरस + दूध - कॉम्बिनेशन योग्य का? अनेक घरांमध्ये आमरसात दूध घालण्याची पद्धत आहे. पण याबाबत वेगवेगळी मते आहेत.

**आयुर्वेद काय सांगतो?**
आयुर्वेदानुसार फळे आणि दूध हे एकत्र खाणे (विरुद्ध आहार) टाळावे, असे सांगितले जाते.

**पचनावर होणारा परिणाम**
आंबा आणि दूध एकत्र घेतल्यास काही लोकांना पचनाचा त्रास, गॅस किंवा ॲसिडिटी होऊ शकते.

**सर्वांना त्रास होतो का?**
नाही, काही लोकांना हे कॉम्बिनेशन सूट होते, पण सगळ्यांसाठी नाही.

**कोणाला टाळावे?**
ज्यांना पोटाचे त्रास, ॲसिडिटी किंवा सेंसिटिव्ह पचन आहे त्यांनी हे टाळावे.

**योग्य पर्याय कोणता? :** आमरस साधाच खाणे किंवा थोडे साजूक तूप घालून खाणे अधिक योग्य मानले जाते.

**दूध कधी घ्यावे? :** दूध वेगळ्या वेळेला घेणे पचनासाठी अधिक चांगले असते.

### भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ

## आज मासिक जनजागर सांगता सोहळा

### अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर विधिवत भूमिपूजनाचे आयोजन

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान

श्री मंगलग्रह मंदिर
अमळनेर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शेतजमिनीचा पोत सुधारण्यासह सुजलाम्-सुफलाम् शेतीसाठी वर्ष प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याचे औचित्य साधून गेल्या १९ मार्च २०२६ रोजी विविध मंत्री महोदयांसह शेतकऱ्यांच्या साक्षीने शुभारंभ करण्यात आलेल्या 'भूमी सुपोषण अभियान' या राष्ट्रीय चळवळ जनजागराला उद्या, रविवार, दि. १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या पवित्र मुहूर्तावर एक महिना पूर्ण होत आहे.

या निमित्ताने श्री मंगळग्रह मंदिर परिसरात सकाळी ८ वाजता या अभियानाचा मासिक जनजागर सांगता सोहळा आयोजित करण्यात आला आहे. अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सांगता सोहळ्यास प्रांताधिकारी




मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, डीवायएसपी विनायक कोते, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी साठे, तालुका कृषी अधिकारी ठाकरे, अमळनेर तालुक्यातील कृषी क्षेत्रातील विविध पुरस्कारप्राप्त गणमान्य व्यक्ती सतीश निंबाजी काटे (कोळपिंप्री), भाऊगीर धुडकूगीर गोसावी( नगाव), सौ. पुष्पलता साहेबराव पाटील (राजवड), सुरेश पिरन पाटील, श्रीमती राजश्री राजेश पाटील या महानुभवांसह तालुक्यातील शेतकरी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी होणाऱ्या भव्य-दिव्य भूमिपूजन कार्यक्रमासाठी अमळनेर तालुक्यासह विविध गावांतील शेतकऱ्यांनी आपापल्या शेतांतून एक मूठ माती सोबत आणावी. ही माती एकत्रित करून तिचे विधिवत पूजन आपल्या सर्वांच्या साक्षीने केले जाणार आहे. त्यानंतर ही विधिवत अभिमंत्रित केलेली माती आपापल्या गावी परत नेऊन आपापल्या शेतात टाकावयाची आहे. त्यासोबतच भूमी सुपोषणाच्या या परमपवित्र कार्याचा स्वतःसह इतरांनाही जागर करण्यासाठी अभियानात सहभागी करावयाचे आहे. याकरिता सर्व महानुभवांसह शेतकऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## संपादकीय

## महिला आरक्षण सोयीचे राजकारण?

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात 'महिला आरक्षण विधेयक' (नारीशक्ती वंदन अधिनियम) हा विषय गेली अनेक दशके चर्चेच्या केंद्रस्थानी राहिला आहे. संसदेत आणि विधिमंडळात महिलांना 33 टक्के आरक्षण मिळावे, यासाठी महिला संघटना आणि कार्यकर्त्यांनी दीर्घकाळ लढा दिला. मात्र, अलीकडच्या काळात या विधेयकाच्या संदर्भात जी राजकीय कोंडी निर्माण झाली आहे, ती लोकशाहीतील खऱ्या अर्थाने स्त्री-सक्षमीकरणाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. संसदेत या विधेयकाची प्रक्रिया ज्या प्रकारे हाताळली गेली, ती केवळ नामंजूर होणे नसून, ती भारतीय राजकारणातील 'पितृसत्ताक मानसिकतेचा' एक नमुना ठरली आहे. विधेयकाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा हा 'आरक्षणांतर्गत आरक्षण' म्हणजेच ओबीसी, दलित आणि अल्पसंख्याक महिलांच्या समावेशाचा मुद्दा आहे. ज्या राजकीय पक्षांनी वेळोवेळी या विधेयकाला पाठिंबा दर्शवला, त्यांनीच अंमलबजावणीच्या वेळी सोयीस्कर भूमिका घेत या प्रक्रियेला खीळ घातली. महिलांना मुख्य प्रवाहात आणणे, हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर तो सत्तेच्या केंद्रस्थानी सर्वसमावेशकता आणण्याचा प्रयत्न आहे. परंतु, जेव्हा जेव्हा हे विधेयक प्रत्यक्षात येण्याची वेळ येते, तेव्हा तेव्हा नवीन तांत्रिक कारणे पुढे करून ते थंड बस्त्यात टाकले जाते.

या विधेयकाची अंमलबजावणी करताना 'जनगणना' आणि 'मतदारसंघांची पुनर्रचना' यांसारख्या तांत्रिक अटी जोडणे, हे महिलांच्या राजकीय सहभागाला विलंब लावण्याचे एक साधन वाटते. आजच्या डिजिटल युगात अशा अटींचे निमित्त सांगून महिलांना सत्तेपासून दूर ठेवणे, हे लोकशाहीच्या हिताचे नाही. खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचा विचार करायचा असेल, तर राजकीय पक्षांनी स्वत:च्या पक्षांतर्गत निवडणुकांमध्ये महिलांना 33 टक्के उमेदवारी देऊन सुरुवात करायला हवी. परंतु, दुर्दैवाने बहुतेक राजकीय पक्ष हे 'घराणेशाही' आणि 'स्वार्था'च्या पलीकडे जाऊन महिला नेतृत्वाला संधी देण्यास तयार नाहीत. केवळ निवडणुका जिंकण्यासाठी महिलांचा मतपेटी म्हणून वापर करणे आणि त्यांना धोरणकर्त्यांच्या खुर्चीपासून वंचित ठेवणे, ही दुटप्पी भूमिका आता उघड झाली आहे.महिला आरक्षण विधेयकाचे अधांतरी लटकणे हे केवळ राजकीय अपयश नाही, तर ती एक सामाजिक शोकांतिका आहे. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला, तरच देशाच्या धोरणांमध्ये शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेसारख्या विषयांना प्राधान्य मिळेल. आजही संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे. या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायद्याची गरज नसून, ती अंमलबजावणी करण्याची राजकीय इच्छाशक्ती अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा समाजात अर्ध्या लोकसंख्येला समान संधी मिळत नाही, तेव्हा देशाचा सर्वांगीण विकास कसा शक्य आहे?

संसदेतील हे 'नामंजूरीचे नाट्य' थांबवून सर्व राजकीय पक्षांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून या ऐतिहासिक विधेयकावर एकमत करण्याची वेळ आली आहे. महिलांना सत्तेत वाटा देणे ही काही 'भिक्षा' नाही, तर तो त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. जोपर्यंत अर्ध्या लोकसंख्येला सत्तेच्या टेबलवर समान खुर्ची मिळत नाही, तोपर्यंत भारताच्या विकासगाथेला पूर्णविराम मिळणार नाही. इतिहासाच्या पानावर केवळ आश्वासने नोंदवू नका, तर कर्तृत्वाची संधी द्या. महिला आरक्षण विधेयक हे केवळ कागदावर राहू नये, तर ते संसदेच्या पायरीवर प्रत्यक्ष सत्तेच्या रूपात अवतरले पाहिजे. सत्तेचे विकेंद्रीकरण करताना लिंगभेदाचा अडथळा दूर करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' यांसारख्या घोषणा केवळ राजकीय जुमले ठरतील. आता वेळ शब्दांची नसून, कृतीची आहे. महिलांच्या नेतृत्वाशिवाय भारताची अमृतकाळातील प्रगती अपूर्णच राहील, हे लोकप्रतिनिधींनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

## आखाजी महोत्सवाने वेधले लक्ष



अमळनेर : आखाजी महोत्सवाला महिला भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती.

# परंपरा, संस्कृती आणि उत्साहाचा संगम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा






अमळनेर : आखाजी महोत्सवात मनोगत व्यक्त करताना भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार साहेबराव पाटील, विक्रांत पाटील, डॉ. सदाशिव सूर्यवंशी व इतर मान्यवर.

अमळनेर : खान्देशातील आखाजी महोत्सव हा अहिराणी संस्कृतीतील महत्वाचा सण असून गौराई, झोक्यावरची गाणी , जात्यावरील गाणी या रूढी परंपरा जतन करून त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. पहिला आखाजी महोत्सव प्रचंड गर्दीने यशस्वी झाला आहे त्यामुळे हा कार्यक्रम शासकीय आणि मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा आणि यासाठी शासकीय निधी मिळवून देण्यासाठी सांस्कृतिक मंत्री आणि शासनाकडे प्रयत्न करेल असे प्रतिपादन भाजप चे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी केले.

खान्देश साहित्य संघ तर्फे अमळनेर येथील एल आय सी कॉलनीत आखाजी महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष प्रा डॉ सदाशिव सूर्यवंशी होते. राजेश पांडे पुढे म्हणाले की मला अमळनेर सोडून ३८ वर्षे झाली मात्र अहिराणीची गोडी कमी झाली नाही म्हणून अहिराणीतून बोलत आहे. महिलानी या आधुनिक जगातही ही परंपरा टिकवून ठेवावी.

यावेळी आमदार अनिल पाटील यांनी सांगितले की महिलांनी अजूनही रूढी ,परंपरा जतन करून ठेवल्या ही अभिमानास्पद बाब आहे. माजी आमदार साहेबराव पाटील यांनीही अहिराणीत फटकेबाजी केली. प्रास्ताविक संघाचे जिल्हाध्यक्ष शरद धनगर यांनी तर स्वागतपर भाषण स्वागताध्यक्ष कृउबा सभापती अशोक आधार पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून साहित्य संघाचे सचिव रमेश बोरसे , खजिनदार प्राचार्या रत्नाताई पाटील , जेष्ठ अहिराणी साहित्यिक कृष्णा पाटील , कवी हिरामण कंखरे , अहिराणी साहित्यिक गोकुळ बागुल , शाहीर नाना पाटील , भाऊसाहेब देशमुख, जयवंतराव पाटील , डॉ अनिल शिंदें , दिनेश नाईक ,एल टी पाटील हजर होते.

सभापती अशोक पाटील , लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ परीक्षित बाविस्कर , उपनगराध्यक्ष प्रशांत निकम , ॲड व्ही आर पाटील , माजी नगरसेवक विक्रांत पाटील , म. वा. मंडळाचे अध्यक्ष डॉ अविनाश जोशी, मंगळग्रह संस्थेचे अध्यक्ष डॉ डिगंबर महाले , बाजार समिती संचालक सचिन पाटील , अमेय मुंदडा , रिता बाविस्कर , राजू फपोरेकर ,नगरसेवक सचिन पाटील , ज्ञानेश्वर धनगर , जयेशकुमार काटे यांनी बक्षीस व कार्यक्रमासाठी योगदान दिले.यावेळी पारंपरिक रूढी परंपरा प्रमाणे स्पर्धा घेण्यात आल्या. परीक्षक म्हणून वसुंधरा लांडगे , प्रा शीला पाटील , लीना पाटील , सुरेखा बाविस्कर , दर्शना पवार ,बोरकर यांनी काम पाहिले. सुत्रसंचालन सानेगुरुजी शिक्षक साहित्य संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय पाटील , पूनम बेडसे यांनी तर आभार उमेश काटे यांनी मानले.

### यांनी मिळवली बक्षिसे

पुरणपोळी स्पर्धा प्रथम प्रतिभा चौधरी ,द्वितीय नयना पाटील, मंगल सोनवणे , झोक्यावरचे गाणे प्रथम जोडी मेघना पवार, दीपिका पाटील , द्वितीय रेखा भागवत पूजा अधिकार, तृतीय कविता पाटील योगिता पांडे, उखाणे वेशभूषा स्पर्धा विजयाताई पाटील , द्वितीय पल्लवी पुरुषोत्तम पाटील , तृतीय राजश्री मनोहर नेरकर , आरास स्पर्धा प्रथम जिजाऊ ग्रुप , द्वितीय स्वामी समर्थ ग्रुप , तृतीय धनदायी मंडळ , घटयावरील गाणे प्रथम रंजना महाजन ,चित्रकला महाजन द्वितीय आशा दुसाने, लता दुसाने, तृतीय श्यामल पाटील ,कल्पना देवरे यांनी बक्षिसे मिळवली






अमळनेर : संघठन सृजन अभियानात बोलताना काँग्रेसचे निरिक्षक प्रमोदकुमार जयंत, प्रदीप पवार, आरीज बेग मिर्झा, डॉ. अरविंद कोलते आदी दुसऱ्या छायाचित्रात काँग्रेसचे पदाधिकारी व सदस्य.

# काँग्रेसचे संघटन सृजन अभियान उत्साहात

## पदाधिकाऱ्यांची चाचपणी सुरू; संघटनेचा घेतला सखोल आढावा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : महाराष्ट्रभर सुरू असलेल्या काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियानाच्या पार्श्वभूमीवर १७ एप्रिल २०२६ रोजी अमळनेर येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. गलवाडे रोडवरील अंबिका मंगल कार्यालयात सायंकाळी ४.०० वाजता निरीक्षक दाखल झाले. या वेळी जुने-नवे मिळून सुमारे ५५० ते ६०० काँग्रेस प्रेमी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविकात काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्री. भागवत केशव सूर्यवंशी यांनी संघटन सृजन अभियानाचे महत्त्व स्पष्ट केले. संघटनेचा सखोल आढावा घेऊन आवश्यक ते बदल करणे, संघटना अधिक कृतिशील बनवणे आणि पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवणे हे या अभियानाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच निष्क्रिय, कामचोर, ढोंगी व भ्रष्ट पदाधिकाऱ्यांना संघटनेतून बाजूला करण्यावरही त्यांनी भर दिला.

यानंतर निरीक्षकांनी मार्गदर्शन केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे निरीक्षक मा. श्री. प्रमोद कुमार जयंत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे निरीक्षक श्री. आरीज बेग मिर्झा, डॉ. अरविंद कोलते तसेच जळगाव जिल्हाध्यक्ष बाळासाहेब प्रदीप पवार यांनी अभियानाची सविस्तर माहिती दिली. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यासाठी प्रत्यक्ष एक-एक भेट किंवा गटांनुसार संवाद साधला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. श्री. प्रमोद कुमार जयंत यांनी हिंदीत केलेल्या भाषणात शेरो-शायरीची फोडणी देत उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष श्री. गजेंद्र साळुंखे यांनी केले.यानंतर स्वतंत्र खोल्यांमध्ये प्रत्यक्ष संवादाची प्रक्रिया पार पडली. एका खोलीत श्री. प्रमोद कुमार जयंत यांनी जिल्हाध्यक्षपदाबाबत कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली, तर दुसऱ्या खोलीत डॉ. अरविंद कोलते व श्री. आरीज बेग मिर्झा यांनी तालुकाध्यक्षपदासाठी इच्छुकांची मते ऐकून घेतली. जिल्हाध्यक्षपदासाठी सुमारे ५ ते ६ कार्यकर्त्यांनी अर्ज भरले, तर अमळनेर तालुका काँग्रेस अध्यक्षपदासाठी ६ ते ८ इच्छुकांनी आपले अर्ज निरीक्षकांकडे सादर केले. हा संघटन सृजन अभियान कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# आजच सोने खरेदी करा, सोन्याचे भाव वाढणार?

## भारतीय बँकांकडून मोठा निर्णय; थेट आयात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




गेल्या काही दिवसांत सोने आणि चांदीचे भाव घसरताना दिसले. सोने आपल्या उच्चांकापेक्षा खूपच कमी झाले. मात्र, आता सोने आणि चांदीबद्दल अत्यंत मोठी बातमी पुढे येत आहे. ज्यानंतर सोने खरेदी करण्याचे स्वप्न बघण्याऱ्यांना मोठा धक्का बसू शकतो.

नुकत्याच एका अहवालानुसार भारतीय बँकांनी परदेशातून सोने आणि चांदीच्या आयातीच्या ऑर्डर थांबविण्याचा मोठा निर्णय घेतला. सीमा शुल्कामुळे ऑर्डर थांबविल्याची माहिती मिळत आहे. सरकारकडून सोने आणि चांदी आयातीबाबत कोणताही आदेश जारी करण्यात आला नाही. त्यानंतर बँकांनी परदेशातून सोने आयात थांबवण्याचा निर्णय घेतला. सरकारने अजूनही अधिसूचना जारी केली नाही. या घडामोडींमुळे देशात सोने आणि चांदीच्या भावात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

सध्याच्या घडीला देशात उच्चांकापेक्षा सोन्याचे भाव कमी आहेत. मात्र, अचानकपणे सोन्याचे भाव वधारू शकतात. या निर्णयाने भारतात सोन्याची कमी निर्माण होऊ शकते. भारतात सोने आणि चांदी विदेशातूनच आयात होते. भारताचा स्वत:चा असा कोणताच सोर्स नाही. सरकारने सोने आणि चांदीबाबत सीमा शुल्क आदेश शेवटी एप्रिल २०२५ मध्ये काढला होता. जो ३१ मार्च २०२६ पर्यंतच वैध होता. आता बँक सरकारच्या नव्या आदेशाच्या प्रतिक्षेत आहेत.

जोपर्यंत सरकारकडून नवीन आदेश काढला जात नाही, तोपर्यंत बँक सोने खरेदी करणार नाहीत. सराफ व्यापाऱ्यांना आशा होती, की सरकार डीजीएफटी दरवर्षीप्रमाणे एप्रिलच्या सुरूवातीला हा आदेश जारी करेल. पण प्रत्यक्षात तसे घडले नाही.

## साडेतीन मुहूर्तापैकी एक; आज अक्षय्य तृतीया

जमीन, घर यासारख्या मालमत्तेत गुंतवणूक करणे पसंत करतात. याशिवाय विवाह, साखरपुडा किंवा इतर कौटुंबिक मंगल कार्य सुरू करण्यासाठीही हा दिवस उत्तम मानला जातो. धार्मिक दृष्टिकोनातून या दिवशी दान, जप, पूजा आणि मंदिर दर्शन केल्याने सकारात्मक ऊर्जा मिळते आणि मन:शांती लाभत.

**परंपरेत साडेतीन मुहूर्ताचे विशेष स्थान**

मराठी संस्कृतीत साडेतीन मुहूर्तांना विशेष महत्त्व आहे. या दिवसांवर अनेक कुटुंबे मोठे निर्णय घेतात. कारण या काळात सुरू केलेले कार्य यशस्वी आणि स्थिर राहते, अशी श्रद्धा आहे. अक्षय्य तृतीया हा त्यापैकी एक महत्त्वाचा दिवस असल्याने प्रत्येक वर्षी या दिवशी नवीन सुरूवात करण्यासाठी आणि समृद्धीची वाटचाल सुरू करण्यासाठी लोक मोठ्या श्रद्धेने या दिवसाचे स्वागत करतात.

# भूमी सुपोषण अभियानाला शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर :शेतजमिनीचे हरवलेले गतवैभव परत मिळवण्यासाठी आणि आपली धरणीमाता पुन्हा एकदा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी सुरू झालेल्या 'भूमी सुपोषण अभियान' या राष्ट्रीय चळवळीने अमळनेर तालुक्यात जोर पकडला आहे. अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत असलेल्या या अभियानांतर्गत शनिवारी विविध गावांमध्ये जनजागर रथ पोहोचला असता, शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे जोरदार स्वागत केले.शनिवारी, दिनांक १८ एप्रिल रोजी जनजागर रथाने अमळनेर तालुक्यातील धार, मालपूर, धानोरा फाटा, मारवड, गोवर्धन, बोरगाव, बोहरा, कलमसरा, पाडळसरा आणि निम या गावांना भेट दिली. प्रत्येक गावात ग्रामस्थांनी आणि शेतकरी बांधवांनी रथाचे उत्साहात स्वागत करून या मोहिमेत सहभागी होण्याचा संकल्प केला.या महत्त्वपूर्ण मोहिमेला महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे मोलाचे तांत्रिक मार्गदर्शन आणि सहकार्य लाभत आहे. शासकीय यंत्रणा आणि सेवाभावी संस्था यांच्या या एकत्रित प्रयत्नांमुळे 'भूमी सुपोषण अभियान' आता तालुक्याच्या घराघरांत पोहोचले असून, ते एका व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप धारण करत आहे.




अमळनेर : भूमी सुपोषण जनजागर रथाजवळ शेतकऱ्यांनी भेट दिली.

## तिसऱ्या मजल्यावरून पडून मजुराचा मृत्यू

ग्लोबल महादेश वृत्तसेवा

अमळनेर : येथील बसस्थानकाजवळील पाचपावली मंदिर परिसरात सुरू असलेल्या एका इमारतीच्या बांधकामस्थळी गुरुवारी दि.१६ ला सकाळी भीषण अपघात घडला. इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याने ३५ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाला. गणेश छगन राठोड असे मृत मजुराचे नाव असून, तो पारोळा तालुक्यातील रामनगर तांडा येथील रहिवासी होता.गुरुवारी सकाळी सुमारे ९ वाजेच्या सुमारास गणेश राठोड हा इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर लिफ्टजवळील ठिकाणी काम करत होता. काम सुरू असताना अचानक त्याचा तोल गेला आणि तो थेट खाली कोसळला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. गणेशला तातडीने स्टेशन रोडवरील सुयश हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. दिनेश पाटील यांनी त्याच्यावर प्राथमिक उपचार केले. मात्र, जखमा गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला धुळे येथे हलवण्याचा सल्ला देण्यात आला. रुग्णवाहिकेतून धुळ्याकडे नेत असताना त्याची प्राणज्योत मालवली. धुळे येथे शवविच्छेदन करण्यात आले. गणेश राठोड हा कुटुंबातील एकमेव कमावता सदस्य होता. त्याच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली आणि एक भाऊ असा परिवार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# आरोग्यदायी यकृतासाठी जागरूकता आवश्यक

## जागतिक यकृत दिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


दरवर्षी १९ एप्रिल हा दिवस 'जागतिक यकृत दिन' म्हणून साजरा केला जातो. मानवी शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव असलेल्या यकृताच्या (लिव्हरच्या) आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. बदलती जीवनशैली, अयोग्य आहार आणि वाढते व्यसन यामुळे यकृताशी संबंधित आजार झपाट्याने वाढताना दिसत आहेत. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

### यकृताचे कार्य आणि महत्त्व

यकृत हे शरीरातील सर्वांत मोठे अंतर्गत अवयव असून ते अनेक महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडते. अन्नपचन, शरीरातील विषारी घटकांचे निर्मूलन, पोषक तत्त्वांचे साठवण आणि रक्तातील साखरेचे संतुलन राखणे ही त्याची प्रमुख कामे आहेत. यकृत योग्य प्रकारे कार्यरत असेल, तर संपूर्ण शरीराचे आरोग्य चांगले राहते.

### यकृताचे आजार : वाढती समस्या

आजच्या घडीला फॅटी लिव्हर, हिपॅटायटिस, लिव्हर सिरोसिस आणि लिव्हर कॅन्सर यांसारखे आजार मोठ्या प्रमाणावर आढळतात. विशेषतः मद्यपान, तंबाखू सेवन, जंकफूडचे अतिसेवन, लठ्ठपणा आणि व्यायामाचा अभाव यामुळे हे आजार वाढत आहेत. अनेकवेळा सुरूवातीला लक्षणे स्पष्ट दिसत नसल्यामुळे रोग गंभीर झाल्यावरच निदान होते.



### लक्षणांकडे दुर्लक्ष नको

भूक न लागणे, थकवा, त्वचा किंवा डोळे पिवळे पडणे (पांडुरोग), पोट फुगणे, वजन अचानक कमी होणे ही यकृताच्या आजारांची काही सामान्य लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

### प्रतिबंध हाच उत्तम उपाय

यकृताचे आरोग्य टिकविण्यासाठी काही सोप्या सवयी अंगीकारणे गरजेचे आहे.

- संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या
- नियमित व्यायाम करा
- मद्यपान आणि तंबाखू सेवन टाळा
- स्वच्छतेची काळजी घ्या आणि सुरक्षित पाणी प्या
- डॉक्टरांच्या सल्ल्याने लसीकरण (विशेषतः हिपॅटायटिससाठी) करून घ्या
- जागरूकता आणि नियमित तपासणी आवश्यक


यकृताचे आजार टाळण्यासाठी नियमित आरोग्य तपासणी महत्त्वाची आहे. वेळेवर निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात. तसेच समाजात याबाबत जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. जागतिक यकृत दिन हा केवळ एक दिवस नसून, आपल्या आरोग्याची जबाबदारी ओळखण्याची संधी आहे. योग्य जीवनशैली, संतुलित आहार आणि नियमित तपासणी यांद्वारे आपण यकृताचे आरोग्य चांगले राखू शकतो. 'स्वस्थ यकृत, निरोगी जीवन' हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे.

# उद्योजकता व दूरदृष्टीचे प्रतीक : मुकेश अंबानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

आजच्या आधुनिक भारताच्या औद्योगिक आणि आर्थिक जडणघडणीत ज्या काही मोजक्या व्यक्तींचे योगदान अतुलनीय आहे त्यात मुकेश धीरूभाई अंबानी हे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांनी केवळ आपल्या कंपनीलाच नव्हे, तर संपूर्ण भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक स्तरावर एक नवी ओळख मिळवून दिली आहे. मुकेश अंबानी यांचा जन्म १९ एप्रिल १९५७ रोजी झाला. त्यांचे वडील धीरूभाई अंबानी हे एक द्रष्टे उद्योजक होते, की ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत मुकेश अंबानी यांनी रिलायन्सचा वारसा समर्थपणे पेललाच नाही, तर त्याला नवनवीन उंचीवर नेऊन ठेवले.



केमिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी तंत्रज्ञान आणि व्यवसायाची उत्तम सांगड घातली. जामनगर येथील जगातील सर्वांत मोठी रिफायनरी उभारणे असो किंवा टेलिकॉम क्षेत्रात 'जिओ'च्या माध्यमातून डिजिटल क्रांती घडवून आणणे असो, त्यांच्या प्रत्येक निर्णयात एक दूरदृष्टी दिसून येते. त्यांच्या कार्यशैलीचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'बदलत्या काळाची ओळख'. जेव्हा जगाला इंटरनेटची गरज होती तेव्हा त्यांनी स्वस्त दरात डेटा उपलब्ध करून देऊन सामान्य भारतीयाला डिजिटल जगाशी जोडले. केवळ टेलिकॉमच नव्हे, तर रिटेल, पेट्रोकेमिकल्स आणि आता ग्रीन एनर्जी (हरित ऊर्जा) अशा विविध क्षेत्रांत त्यांनी रिलायन्सचा विस्तार केला आहे. शाश्वत भविष्यासाठी ते सौर आणि हायड्रोजन ऊर्जेसारख्या प्रकल्पांत मोठी गुंतवणूक करत आहेत, जे त्यांच्या भविष्यातील प्रगतीची द्योतक आहे. मुकेश अंबानी यांचे जीवन केवळ व्यवसायापुरते मर्यादित नाही. त्यांचे कुटुंब आणि सामाजिक जबाबदारीबद्दलची त्यांची जाणही तितकीच महत्त्वाची आहे. रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकासासाठी ते मोठ्या प्रमाणावर कार्य करत आहेत.

विशेषतः कोरोना काळात त्यांनी केलेल्या मदतीची नोंद घेतली गेली आहे. त्यांच्यासोबत आता आकाश, ईशा आणि अनंत हे त्यांची पुढची पिढी व्यवसायाची धुरा सांभाळत आहे. ज्यामुळे रिलायन्सचे भविष्य सुरक्षित आणि प्रगतशील वाटते. मुकेश अंबानी हे केवळ एक श्रीमंत उद्योजक नाहीत, तर ते धाडसी निर्णय घेण्याची क्षमता असलेले एक अभ्यासू नेते आहेत. 'मोठा विचार करा, वेगवान विचार करा आणि भविष्याचा विचार करा' हे त्यांच्या यशाचे गमक आहे. त्यांचे कार्य आजच्या तरुण उद्योजकांसाठी केवळ प्रेरणादायी नाही, तर ते भारतीय उद्योजकतेची एक जागतिक यशोगाथा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्सने केवळ संपत्ती निर्माण केली नाही, तर लाखो भारतीयांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. ज्यामुळे भारताची प्रगती अधिक वेगवान होत आहे.



# बारा कोटींच्या कारमधून तरुण विकतो गरमागरम चहा

## दिवसाला मिळणारी रक्कम ऐकून मोठमोठे बिझनेसमॅनही होतील शॉक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एक काळ होतास की जेव्हा चहा विकणे हा अशिक्षित लोकांचा उद्योग मानला जात होता. आई-बाबा आपल्या मुलांना म्हणायचे, 'शिकला नाहीस तर टपरीवर चहा विकावा लागेल.' पण सध्याच्या काळात उच्चशिक्षित लोकही चहा विकताना दिसत आहेत. किंबहुना एक चहावाला टपरीवर जितकी कमाई करतो तितका पगार एखाद्या मल्टिनॅशनल कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यालाही मिळत नाही. चहावाले स्वतःच्या फ्रेंचायझी विकताना दिसत आहेत. असो. पण एका तरुणाने या चहाच्या बिझनेसला एक पायरी आणखी वर नेली आहे. होय, हा तरुण चक्क १२ कोटींच्या Rolls-Royce लक्झरी कारमधून चहा विकतो आहे. विश्वास बसत नसेल तर हा व्हायरल होणारा व्हिडिओ पाहाच.

### किती पैसे मिळाले?

हा व्हिडिओ deluxebhaiyaji या इन्स्टाग्राम पेजवरून शेअर करण्यात आला आहे. या व्हिडिओमध्ये एका तरुणाला पाहू शकता. त्याने एक लाख रुपये खर्च करून एक दिवसासाठी भाड्याने Rolls-Royce कार घेतली आणि त्यातून चक्क चहा विकला. चहासोबत त्याने ग्राहकांना लक्झरी कारमध्ये बसण्याचा अनुभवही दिला. या अनोख्या कल्पनेतून त्याने दिवसभरात ८८ हजार ४०० रुपयांची कमाई केली. प्रत्यक्षात या बिझनेसमध्ये त्याला जवळपास १२ हजार रुपयांचा तोटा झाला. पण ग्राहकांना एक युनिक अनुभव दिल्याचा आनंद त्याने व्यक्त केला.

भारतामध्ये एका Rolls-Royce कारची किंमत ही जवळपास ७ कोटी ते १२ कोटींच्या आसपास आहे. म्हणजे हा तरुण आपल्या ग्राहकांना तब्बल १२ कोटींच्या कारमध्ये बसून चहा पिण्याचा अनुभव देतो आहे.


### हा तरुण आहे मार्केटिंग जिनिअस

हा व्हिडिओ २ कोटींहून अधिक वेळा पाहिला गेला आहे. तसेच अनेकांनी या व्हिडिओवर विविध प्रतिक्रिया देत या तरुणाच्या हुशारीचे कौतुक केले आहे. कोणी म्हणते आहे, हा तरुण 'मार्केटिंग जिनिअस' आहे. १० रुपयांच्या चहामधून त्यानं दिवसभरात ८८ हजार रुपये कमावले. तर काही जण म्हणत आहेत, हा मुलगा वेगळ्याच ग्रहावरून आला आहे.

या व्हायरल व्हिडिओमुळे चहावाल्यांनी पुन्हा एकदा सोशल मीडियावर लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. कारण गेल्या वर्षभरात फक्त चहाची टपरी चालवणाऱ्या मंडळींनी खरोखर कमाल केली आहे. मग तो डॉली चहावाला असो वा एमबीए चायवाला. ही मंडळी आपल्या युनिक स्टाईलसाठी ओळखली जातात. त्यांनी सोशल मीडियाचा वापर इतक्या चांगल्या प्रकारे केला की ज्यामुळे चहाच्या टपरीलाही एक प्रकारचे ग्लॅमर मिळाले. अहो, बिल गेट्ससारख्या जगप्रसिद्ध उद्योजकांनी सुद्धा डॉली चायवाल्यासोबत रील शूट केला. त्यामुळे चहाच्या उद्योगाकडे तरुणांनी गांभीर्याने पाहायला हरकत नाही, अशी चर्चा सध्या सोशल मीडियावर होत आहे. असो. पण तुम्हाला ही Rolls-Royce मधून चहा विकण्याची कल्पना कशी वाटली?

# आम असली है या केमिकल वाला?

## घर पर इन ५ तरीकों से करें केमिकल से पके आम की पहचान



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जैसे ही गर्मियों का मौसम आता है, हर जगह बाज़ारों में आमों की महक फैलने लगती है। लेकिन क्या आप जानते हैं कि फलों का यह 'राजा' जो आपके घर आ रहा है, वह आपकी सेहत के लिए फ़ायदेमंद है या नुकसानदेह? बाज़ार की भारी मांग को पूरा करने के लिए, कई व्यापारी कैल्शियम कार्बाइड जैसे नुकसानदेह पदार्थों का इस्तेमाल करते हैं। अपने परिवार की सेहत की सुरक्षा के लिए, यह पहचानना बहुत ज़रूरी है कि आपने जो आम खरीदे हैं, वे प्राकृतिक रूप से पके हैं या किसी रसायन तरीके से. इसी बात को ध्यान में रखते हुए, यहां रसायनों से पकाए गए आमों की पहचान करने के ५ तरीके दिए गए हैं...

प्राकृतिक रूप से पके आमों का रंग एक जैसा नहीं होता। उनमें अक्सर हरे और पीले रंगों का मिश्रण दिखाई देता है। अगर कोई आम पूरी तरह से और एक समान रूप से चमकीला पीला दिखाई दे, तो इसका अर्थ है कि उसे रसायनों से पकाया गया है. ऐसे फलों की पहचान करने का यह सबसे सही तरीका है।

स्वाभाविक रूप से पके आमों की पहचान करने के लिए, एक बाल्टी में पानी भरें और उसमें आम डाल दें। जो आम बाल्टी की तली में बैठ जाते हैं, वे स्वाभाविक रूप से पके हुए और रस से भरे होते हैं। इसके विपरीत, रसायनों की मदद से पकाए गए आम पानी की सतह पर तैरते रहते हैं। यह तरीका सुनिश्चित करता है कि आपकी गुणवत्ता योजना सफल हो।

केमिकल से पके आमों का छिलका बहुत ही कोमल और कभी-कभी झुर्रीदार दिखाई देता है। वहीं, प्राकृतिक रूप से पका आम छूने पर थोड़ा सख्त लेकिन दबाने पर लचीला महसूस होता है। रसायनों के प्रभाव से आम का छिलका कहीं-कहीं से काला या गहरे धब्बों वाला हो सकता है।

प्राकृतिक आम की डंठल के पास से एक तेज और भीनी खुशबू आती है। केमिकल वाले आमों में या तो गंध बिल्कुल नहीं होती या फिर उनसे हल्की 'फास्फोरस' या 'आर्सेनिक' जैसी तीखी गंध आती है। सुगंध की यह जांच शुद्धता सुनिश्चित करने का एक कुशल साधन है।

जब आप केमिकल वाला आम काटते हैं, तो उसका गुदा अंदर से कहीं पीला तो कहीं सफेद दिखाई देता है। जबकि प्राकृतिक आम अंदर से पूरी तरह गहरा पीला या केसरिया होता है। साथ ही, केमिकल वाले आम को खाने पर गले में हल्की जलन महसूस हो सकती है।

# आयपीएल चीयरलीडर बनना है?

## न फॉर्म, न कोई नोटिस, ऐसे होती है भर्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चीयरलीडिंग का कॉन्सेप्ट १९ वीं सदी के अमेरिका से शुरू होकर आज ग्लोबल स्पोर्ट्स एंटरटेनमेंट का हिस्सा बन चुका है, जिसे भारत में आयपीएलने बड़े मंच पर लोकप्रिय बनाया। आईपीएल में चीयरलीडर्स का चयन किसी खुले आवेदन के जरिए नहीं, बल्कि इवेंट एजेंसियों के माध्यम से किया जाता है, जहां प्रोफेशनल डांस, फिटनेस और स्टेज प्रेजेंस के आधार पर चयन होता है।

इंडियन प्रीमियर लीग में जब चौके-छक्के लगते हैं, तो स्टेडियम का शोर सिर्फ बल्ले की आवाज तक सीमित नहीं रहता। कैमरा जैसे ही बाउंड्री लाइन की ओर घूमता है रंग, संगीत और डांस का एक जीवंत दृश्य सामने आता है। यह दृश्य अब आयपीएल का स्थायी हिस्सा बन चुका है, लेकिन इसके पीछे की कहानी-भर्ती से लेकर इसके इतिहास तक काफी दिलचस्प और कम चर्चा में रहने वाली है। आयपीएल में चीयरलीडर बनने के लिए कोई सीधा आवेदन फॉर्म या आधिकारिक नोटिफिकेशन मौजूद नहीं है। न ही भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड इस संबंध में कोई सार्वजनिक प्रक्रिया जारी करता है।

दरअसल, आयपीएस फ्रेंचाइजी सीधे तौर पर भर्ती नहीं करतीं। यह जिम्मेदारी इवेंट मैनेजमेंट कंपनियों को सौंप जाती है, जो देश-विदेश से प्रोफेशनल डांसर और परफॉर्मर्स का चयन करती हैं।

चीयरलीडर बनने की प्रक्रिया किसी रियलिटी शो से कम नहीं होती। आमतौर पर इसमें शामिल होते हैं।

- ऑनलाइन कास्टिंग कॉल या एजेंसी के जरिए आवेदन
- डांस ऑडिश न या वीडियो सबमिशन
- फिटनेस और स्टेमिना टेस्ट



- कैमरा प्रेजेंस और एक्सप्रेशन का आकलन

अंतिम सूची फ्रेंचाइजी को भेजी जाती है, जिसके बाद कॉन्ट्रैक्ट किया जाता है। यही कारण है कि इस भूमिका के लिए सिर्फ आकर्षक व्यक्तित्व नहीं, बल्कि मजबूत डांसिंग स्किल और स्टेज अनुभव जरूरी होता है।

### विदेशी चेहरों की मौजूदगी क्यों?

आयपीएस में अक्सर विदेशी चीयरलीडर्स की संख्या ज्यादा दिखाई देती है। इसकी वजह यह है कि इंटरनेशनल डांस और लाइव एंटरटेनमेंट इंडस्ट्री अधिक संगठित है और एजेंसियों के पास वैश्विक टैलेंट पूल होता है।

हालांकि, भारतीय कलाकारों के लिए भी अवसर मौजूद हैं, लेकिन इसके लिए प्रोफेशनल ट्रेनिंग और सही नेटवर्क जरूरी माना जाता है। इंडस्ट्री से जुड़े सूत्र बताते हैं कि चीयरलीडर्स की फीस प्रति मैच करीब १२,००० से २५,००० रुपये के बीच होती। इसके अलावा होटल, यात्रा और अन्य सुविधाएं भी दी जाती हैं। हालांकि यह पूरी तरह कॉन्ट्रैक्ट आधारित काम है। हर सीजन नई भर्ती होती है और स्थायित्व की कोई रंटी नहीं होती।

### कहां से आया चीयरलीडिंग का कॉन्सेप्ट?

चीयरलीडिंग की शुरुआत भारत में नहीं, बल्कि अमेरिका में हुई। साल १८९८ में युनिव्हर्सिटी ऑफ माइन्नेसोचा में पहली बार दर्शकों को संगठित तरीके से उत्साहित करने की परंपरा शुरू हुई। शुरुआती दौर में यह भूमिका पुरुषों की होती थी, जो टीम के समर्थन में नारे लगाते थे। २० वीं सदी के मध्य तक इसमें महिलाओं की भागीदारी बढ़ी और यह गतिविधि डांस, जिम्नास्टिक्स और स्टंट्स के साथ एक प्रोफेशनल परफॉर्मिंग आर्ट में बदल गई। अमेरिका की एनएफएल ने १९६०-७० के दशक में चीयरलीडिंग को ग्लैमर और प्रोफेशनलिज्म के साथ जोड़ा। इसके बाद यह मॉडल दुनिया की अन्यखेल लीग्स में भी अपनाया गया। भारत में यह ट्रेंड आईपीएल के पहले सीजन (२००८) के साथ बड़े पैमाने पर सामने आया, जहां क्रिकेट को 'स्पोर्ट्स + एंटरटेनमेंट' पैकेज के रूप में पेश किया गया।

### ग्लैमर के पीछे की सच्चाई

आईपीएल में चीयरलीडर्स का काम जितना चमकदार दिखता है, उसकी हकीकत उतनी ही अलग है। उनकी भर्ती प्रक्रिया सार्वजनिक नहीं होती औरयह पूरी तरह इवेंट एजेंसियों पर निर्भर रहती है। इसमें प्रतिस्पर्धा बेहद ज्यादा होती है, क्योंकि सीमित जगह के लिए देश-विदेश से बड़ी संख्या में प्रोफेशनल परफॉर्मर्स आवेदन करते हैं। यह काम पूरी तरह कॉन्ट्रैक्ट आधारित होता है, जिसमें स्थायित्व की कोई गारंटी नहीं होती. हर सीजन नई भर्ती होती है, यानी हर बार खुद को फिर से साबित करना पड़ता है।

आयपीएल में चीयरलीडर्स सिर्फ मैच का सजावटी हिस्सा नहीं, बल्कि एक वैश्विक स्पोर्ट्स कल्चर का विस्तार हैं, जिसकी जड़ें १०० साल पुराने अमेरिकी इतिहास में हैं और जिसका चयन आज भी पर्दे के पीछे एजेंसियों के जरिए होता है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे

मंगल पान

# पुण्य, सत्कर्म आणि समृद्धी यांचे प्रतीक

## अक्षय्य तृतीया विशेष

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सण हा केवळ परंपरेचा भाग नसून तो आध्यात्मिक उन्नतीचा मार्गही दर्शवितो. अशाच पवित्र आणि मंगल दिवसांपैकी एक म्हणजे अक्षय्य तृतीया. वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीया तिथीला येणारा हा दिवस 'अक्षय्य' म्हणजे कधीही न संपणारे पुण्य, सत्कर्म आणि समृद्धी यांचे प्रतीक मानला जातो. म्हणूनच या दिवशी केलेले प्रत्येक शुभकर्म अनंतगुणित फळ देणारे ठरते, अशी श्रद्धा आहे.

### अक्षय्य तृतीयेचा आध्यात्मिक अर्थ

'अक्षय्य' या शब्दाचा गूढ अर्थ केवळ भौतिक संपत्तीत नाही, तर आत्मिक समाधानात दडलेला आहे. या दिवशी मन, वचन आणि कर्म यांची शुद्धता साधण्यावर भर दिला जातो. लोभ, अहंकार आणि वाईट प्रवृत्ती यांचा त्याग करून सत्कर्म, दानधर्म आणि ईश्वरभक्ती याकडे वळणे हेच या सणाचे खरे तत्त्वज्ञान आहे. अक्षय्य तृतीया आपल्याला शिकवते की खरे 'अक्षय्य' म्हणजे आपल्या आत्म्याची शांती, चांगले विचार आणि समाजासाठी केलेली निस्वार्थ सेवा.

### पौराणिक आणि धार्मिक संदर्भ

अनेक पौराणिक घटनांमुळे या दिवसाचे महत्त्व अधिक वाढते. भगवान विष्णूंचा सहावा अवतार



भगवान परशुराम यांचा जन्म याच दिवशी झाला, असे मानले जाते. महाभारतातील पांडवांना मिळालेले 'अक्षय्य पात्र' हेही या दिवसाशी संबंधित आहे. ज्यामुळे अन्न कधीही संपत नसे. तसेच गंगा नदीचे पृथ्वीवर अवतरणही या दिवशी झाले, अशी मान्यता आहे. या सर्व घटनांमधून 'अक्षय्य' या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होतो ईश्वरकृपा आणि सत्कर्म यांची अखंडता.

### पूजा, साधना आणि दानधर्म


अक्षय्य तृतीयेच्या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची भक्तिभावाने पूजा केली जाते. जप, ध्यान, हवन आणि सत्संग यांना विशेष महत्त्व दिले जाते. दानधर्म हा या दिवसाचा मुख्य आधार मानला जातो. अन्नदान, जलदान, वस्त्रदान किंवा गरजूंना मदत करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. शास्त्रानुसार या दिवशी केलेले दान अक्षय्य पुण्य देणारे असते.

### भौतिक आणि आध्यात्मिक समतोल

आजच्या आधुनिक युगात अक्षय्य तृतीया म्हणजे प्रामुख्याने सोने खरेदीचा दिवस म्हणून ओळखला जातो. परंतु या सणाचा खरा अर्थ केवळ भौतिक संपत्तीपुरता मर्यादित नाही. सोने खरेदी करण्यापेक्षा सद्गुणांची कमाई आणि नात्यांची जपणूक ही अधिक मौल्यवान आहे. अक्षय्य तृतीया आपल्याला शिकवते की जीवनात भौतिक प्रगतीसोबत आध्यात्मिक प्रगतीही तितकीच महत्त्वाची आहे.

आजच्या काळातील संदेश वाढती स्पर्धा, ताणतणाव आणि भौतिकतेकडे झुकणारा कल यामुळे मनःशांती हरवत चालली आहे. अशा परिस्थितीत अक्षय्य तृतीया आपल्याला अंतर्मुख होण्याची संधी देते. आपल्या कृतींचा विचार करून, सकारात्मकता आणि करुणा यांचा स्वीकार करण्याचा हा दिवस आहे. अक्षय्य तृतीया हा केवळ सण नसून आत्मशुद्धी, सत्कर्म आणि ईश्वराशी नाते दृढ करण्याचा पवित्र दिवस आहे. या दिवशी केलेले चांगले विचार आणि कृती आपल्या जीवनात दीर्घकाळ टिकणारे सुख आणि समाधान निर्माण करतात. 'अक्षय्य संपत्ती ही धनात नसून, ती आपल्या सद्गुणांत आणि सेवाभावात असते', हा संदेश मनात ठेवून हा सण साजरा करणे, हीच खरी परंपरा आणि खरी आध्यात्मिक साधना आहे.

## परशुराम जयंती विशेष



# धर्म, पराक्रम आणि न्यायाचे प्रतीक

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू धर्मातील प्रमुख सणांपैकी एक असलेली परशुराम जयंती मोठ्या श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरी केली जाते. भगवान परशुराम हे भगवान विष्णूंचे सहावे अवतार मानले जातात. वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीया तिथीला त्यांचा जन्म झाला, असे मानले जाते. हा दिवस 'अक्षय्य तृतीया' म्हणूनही प्रसिद्ध असून, त्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

### भगवान परशुरामांचे जीवनकार्य

भगवान परशुराम यांचा जन्म ऋषी जमदग्नी आणि माता रेणुका यांच्यापोटी झाला. ते ब्राह्मण असूनही पराक्रमी योद्धा होते. अन्याय, अत्याचार आणि अधर्माचा नाश करण्यासाठी त्यांनी शस्त्र उचलले. त्यांच्या हातातील 'परशू' (कुऱ्हाड) हे त्यांच्या सामर्थ्याचे प्रतीक मानले जाते. पुराणांनुसार त्या काळात क्षत्रियांनी अत्याचार माजविले होते. समाजातील दुर्बल घटकांवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी भगवान परशुराम यांनी अनेकवेळा पृथ्वीला अत्याचारमुक्त करण्याचे कार्य केले. त्यामुळे ते न्याय आणि धर्मरक्षणाचे प्रतीक ठरले.

### धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व

परशुराम जयंती हा केवळ धार्मिक सण नसून तो संस्कृती आणि परंपरेचा वारसा जपणारा दिवस आहे. या दिवशी मंदिरांमध्ये पूजा-अर्चा, हवन, कीर्तन आणि प्रवचनांचे आयोजन केले जाते. भक्तगण उपवास करतात आणि भगवान परशुरामांची आराधना करतात. हा दिवस 'अक्षय तृतीया' असल्यामुळे कोणतेही शुभ कार्य सुरू करण्यासाठी अत्यंत मंगल मानला जातो. विवाह, गृहप्रवेश, नवीन व्यवसायाची सुरूवात यांसारख्या कामांसाठी हा दिवस विशेष शुभ मानला जातो.

### परशुराम जयंतीचा संदेश

भगवान परशुराम यांचे जीवन आपल्याला अनेक महत्त्वपूर्ण मूल्ये शिकविते. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, सत्य आणि धर्माची बाजू घेणे, तसेच शक्तीचा योग्य वापर करणे हे त्यांचे प्रमुख संदेश आहेत. त्यांच्या जीवनातून संयम, कर्तव्यनिष्ठा आणि धैर्य यांचे महत्त्व अधोरेखित होते.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या बदलत्या समाजात परशुराम जयंतीचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. अन्याय, भ्रष्टाचार आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध लढण्यासाठी प्रत्येकाने सजग राहणे आवश्यक आहे. समाजात शांतता, समता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे गरजेचे आहे. परशुराम जयंती हा सण आपल्याला केवळ धार्मिक श्रद्धा वाढवण्याची संधी देत नाही, तर जीवनमूल्ये आणि नैतिकतेचे धडेही देतो. भगवान परशुराम यांच्या आदर्शांचा स्वीकार करून आपण अधिक सुसंस्कृत आणि न्यायप्रिय समाज घडवू शकतो.

# पितृदोष निवारण, मनःशांतीसाठी उपाय काय?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पितृदोषांचे निवारण, मानसिक शांतेसह मनःशांतीसाठी अक्षय्य तृतीयेला काही विशेष पूजा-अर्चा केल्या जातात. यासाठी काही प्रभावी उपायही सांगितले जातात. ते जाणून घेऊया.

**१) पितृ तर्पण आणि दान**

अमावास्या ही पितरांच्या स्मरणाची तिथी मानली जाते.

**अन्नदान :** या दिवशी गरीब किंवा गरजू व्यक्तीला पांढरे पदार्थ (उदा.- तांदूळ, दूध, साखर) किंवा जेवण दान करावे.

**कावळ्याला अन्न :** दुपारच्या वेळी कावळ्याला किंवा कुत्र्याला अन्नाचा घास द्यावा. यामुळे पितर प्रसन्न होतात, असे मानले जाते.

२) घरातील नकारात्मकता दूर करण्यासाठी मीठ पाण्याचा वापर या दिवशी घरामध्ये पुसताना पाण्यात थोडे खडे मीठ टाकावे. यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा बाहेर जाण्यास मदत होते.



**धूप दाखवणे :** सायंकाळी घरामध्ये भीमसेनी कापूर किंवा गुग्गुळाचा धूप दाखवावा. यामुळे वातावरणात प्रसन्नता राहते.

**३) दिवे लावणे**

**मुख्य दरवाजा :** अमावास्येच्या सायंकाळी घराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला तेलाचे दिवे लावावेत.

**दक्षिण दिशा :** पितरांसाठी घराच्या दक्षिण दिशेला एक दिवा (तीळ तेलाचा किंवा तुपाचा) लावणे शुभ मानले जाते.

**४) पिंपळाच्या झाडाची पूजा**

जर शक्य असेल, तर पिंपळाच्या झाडाला पाणी अर्पण करावे आणि तिथे दिवा लावावा. शास्त्रानुसार अमावस्येला पिंपळाच्या झाडावर विष्णू आणि लक्ष्मीचा वास असतो असे मानले जाते.

**५) जप आणि ध्यान**

अमावास्येला मन थोडे विचलित होण्याची शक्यता असते, म्हणून खालील गोष्टी कराव्यात.

ॐ नमः शिवाय किंवा दत्त गुरूंच्या मंत्राचा जप करावा.

कुलदेवतेचे स्मरण करून घरात नैवेद्य दाखवावा.

**काय टाळाल?**

- या दिवशी शक्यतो वादविवाद टाळावेत.
- घरामध्ये आणि मनात सात्विकता ठेवावी.
- नवीन कामाची सुरूवात किंवा मोठे आर्थिक व्यवहार या दिवशी न करता पुढच्या चांगल्या मुहूर्तावर करणे सोयीचे ठरते.

# आध्यात्मिक परंपरेत अमावास्येचे महत्त्व अनन्यसाधारणच...!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमावास्या ही तिथी सूर्य आणि चंद्राच्या मिलनाची तिथी मानली जाते.

**१) पितृकर्मासाठी सर्वश्रेष्ठ दिवस**

अमावास्या ही तिथी पितरांना (पूर्वजांना) समर्पित आहे. असे मानले जाते, की या दिवशी पितर पृथ्वीच्या जवळ असतात. **तर्पण आणि श्राद्ध :** या दिवशी पितरांच्या नावाने केलेले दान, तर्पण आणि अन्नदान केल्याने त्यांना अक्षय तृप्ती मिळते. **पितृदोषातून मुक्ती :** ज्यांच्या पत्रिकेत पितृदोष आहे, त्यांच्यासाठी अमावास्येचे विधी आणि दान करणे हा सर्वोत्तम उपाय मानला जातो.

**२) आध्यात्मिक आणि मानसिक महत्त्व**

**मनावर ताबा :** चंद्र हा मनाचा कारक आहे. अमावास्येला चंद्र दिसत नसल्याने मानवी मनावर त्याचा प्रभाव पडतो. म्हणूनच या दिवशी ध्यान, नामस्मरण आणि मौन पाळण्यास सांगितले जाते, जेणेकरून मन शांत राहील.

**साधना :** अनेक साधक या दिवशी आपली आध्यात्मिक शक्ती वाढविण्यासाठी विशेष उपासना करतात.

**३) दानधर्माचे महत्त्व**

अमावास्येला केलेल्या दानाचे फळ अनेक पटींनी मिळते, असे शास्त्रात सांगितले आहे. या दिवशी गरजूंना



धान्य, वस्त्र किंवा पाणी दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. गाईला चारा देणे (गोग्रास) किंवा पक्ष्यांना दाणे टाकणे हे पुण्याचे काम मानले जाते.

**४) निसर्ग आणि शेत**

भारतीय परंपरेत अमावास्येला शेतीची कामे किंवा इतर जड कामे न करता निसर्गाला आणि शरीराला विश्रांती देण्याची प्रथा आहे. या दिवशी झाडे किंवा वनस्पती तोडणे टाळले जाते.

**५) नकारात्मकतेचे निवारण**

घराची स्वच्छता करणे, उंबरठ्याची पूजा करणे आणि सायंकाळी दक्षिण दिशेला दिवा लावल्याने घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होते.

# अक्षय्य तृतीयेला सोने-चांदी खरेदी करणे शक्य नाही?

## 'या' ५ वस्तू नक्की खरेदी करा; माता लक्ष्मींची राहणार कृपा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी काही स्वस्त तसेच रोजच्या वापरातील वस्तू खरेदी करणे देखील शुभ मानले जाते. यंदा १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय्य तृतीया साजरी केली जाणार आहे. हिंदू धर्मात साडेतीन मुहूर्तांपैकी अक्षय्य तृतीयेचा दिवस मानला जातो. या दिवशी आपण जे काही काही कार्य हाती घ्याल त्याचे पुण्यफळ कधीच संपत नाही. उलट दुप्पट पटीने वाढते. याच कारणामुळे या दिवशी लोक सोने खरेदी करतात. मात्र, प्रत्येकालाच या दिवशी ते खरेदी करणे शक्य होईलच असे नाही. अशा वेळी जास्त खर्च न करताही आपण या दिवसाला खास बनवू शकता.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी काही स्वस्त तसेच रोजच्या वापरातील वस्तू खरेदी करणे देखील शुभ मानले जाते. त्यामुळे या दिवशी तुम्ही कोणत्या वस्तूंची खरेदी करू शकता हे जाणून घेऊया.

**मातीच्या वस्तू खरेदी करा**

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी मातीचे मडके, दिवा किंवा मातीची कुंडी या वस्तूंची खरेदी करणे शुभ



मानले जाते. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा येते आणि घरातील शांती टिकून राहते.

तांब्याची भांडी घ्या तांबे हा सुद्धा शुभ धातू मानला जातो. या दिवशी तांब्याचे एखादे भांडे खरेदी करणे घरासाठी शुभकारक असते.

**हळद, तांदूळ खरेदी करा**

हळद आणि तांदूळ या वस्तू पूजेच्या साहित्यासाठी वापरल्या जातात. यांना शुभ्रतेचे प्रतीक मानले जाते.

**धणे खरेदी करा**

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी धणे खरेदी करू शकता. यामुळे धनसंपत्तीत भरभराट होते.

**सोने-चांदी खरेदीचा शुभ मुहूर्त**
सकाळी १०.४९ ते दुपारी १२.२१
दुपारी १.५८ ते ३.३५
सायंकाळी ६.५० ते रात्री १०.५८

लाल कापड किंवा कापूस

लाल कापड किंवा कापूस पूजेसाठी वापरता येतो. त्यामुळे या दिवशी या वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाईल.

**दान करा**

जर अक्षय्य तृतीयेला काहीच खरेदी केले नसेल तर अशा वेळी तुम्ही गरजूंना सुद्धा दान करा. यामुळे मनाला शांती मिळते. तसेच सकारात्मक वातावरण राहते.

अक्षय तृतीयेला दान केल्या जाणाऱ्या माठाला 'धर्मघट' असेही म्हणतात. या दानावेळी खालील गोष्टींचे पालन केले जाते. माठ नुसता कोरा न देता तो स्वच्छ पाण्याने भरलेला असावा. त्यात थोडे गंगेचे पाणी, काळे तीळ, वाळा किंवा तुळशीची पाने टाकणे शुभ मानले जाते. माठावर खरबूज किंवा आंबा यांसारखी हंगामी फळे ठेवून तो ब्राह्मणाला किंवा गरजूला दान केला जातो.

**वैज्ञानिक आणि नैसर्गिक दृष्टिकोन**

वैशाख महिन्यात सूर्याचा ताप वाढलेला असतो. अशा वेळी तहानलेल्यांना थंड पाणी मिळावे, हा या दानामागचा शुद्ध सामाजिक हेतू आहे. मातीचा माठ हा पृथ्वी तत्त्वाचे प्रतीक आहे. त्यात साठवलेले पाणी नैसर्गिकरित्या थंड आणि आरोग्यासाठी हितकारक असते.

**पौराणिक संदर्भ**

असे मानले जाते, की अक्षय्य तृतीयेपासूनच त्रेतायुगाचा प्रारंभ झाला होता. या दिवशी दानधर्माची सुरूवात केल्याने अक्षय पुण्याची प्राप्ती होते. 'मदनरत्न' नावाच्या ग्रंथात उल्लेख आहे, की जो मनुष्य या दिवशी पाण्याने भरलेला कुंभ दान करतो, त्याला राजसूय यज्ञासारखे फळ मिळते. अक्षय्य तृतीयेला मातीचा माठ दान करणे म्हणजे केवळ वस्तूचे दान नसून, ते श्रद्धेचे, परोपकाराचे आणि आपल्या पूर्वजांप्रती असलेल्या कृतज्ञतेचे प्रतीक आहे.

## मना सज्जना...

# देहे रक्षणा कारणे यज्ञ केला...



परम स्नेही मित्रहो,

आपण गेल्या भागात २४ व २५ व्या श्लोकांचे अर्थ समजावून घेतले. त्यात येणारा काळ अकल्पित असतो तेव्हा त्याची जाणीव ठेवून जीवन व्यतित कसे करावे ते आपण पाहिले.

आता २६ वा श्लोक समजून घेऊया.

**देहे रक्षणा कारणे यज्ञ केला ।**
**परी शेवटी काळ घेऊनी गेला ॥**
**करी रे मना भक्ति या राघवाची ।**
**पुढे अंतरी सोडी चिंता भवाची ॥ २५ ॥**

जन्माला आलेल्या जीवाला बाल, तारुण्य आणि वृद्धापकाळ या तिन्ही अवस्था याचि देही भोगाव्या लागतात. त्याचे मानवाला बरे-वाईट परिणाम अर्थात सुख-दुःख भोगायला लावतात. हे सर्व देह म्हणून जीवाला भोगावे लागते. देहाची योग्य प्रकारे निगा ठेवली पाहिजे. कारण त्याच्या माध्यमातूनच आपल्याला सुख भोगता येते. त्यासाठीच मानवाची धडपड चालू असते.

ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय यांच्या माध्यमातून देहाद्वारे सुख-दुःख भोगली जातात. म्हणून देहाचे महत्त्व आहे. देह बाह्य आवरण आहे ते हवे तसे शृंगारता येते. कपडेलत्ते, दागदागिने वगैरे बाह्य साज करता येतो.

हा देह कसा जन्मात येतो?

समर्थ म्हणतात...

**तत्त्वे तत्त्व मेळविले । त्यासी देह हे नाम ठेविले ।**
**तें जाणते पुरुष शोधिलें । तत्त्वे तत्त्व ।**

अस्थी, मांस, त्वचा, नाडी, रोम हे पाचही पृथ्वीचे गुणधर्म आहेत. त्या योगे निर्माण झालेल्या प्रत्येक शरीरी हे वर्म दिसून येते. तसे हे स्थूळ शरीर पाच तत्त्वांचे पंचवीस गुणांचा विस्तार आहे. या शरीराच्या रक्षणासाठीच जीवाचे वर्तन व्यवहार होता असतात. तेव्हा ज्या तत्त्वांच्या योगे देह घडला, त्याची जाणीव जाणते होऊन ठेवली पाहिजे.

हे सारे वर्तन व्यवहार पाहता देह शेवटी काळाच्या मुखी घास होणार हे वास्तव मान्य करणे कठीण होते. ते अटळ सत्य आहे. ते स्वीकारायला हवे. परंतु जर राघवाला अनन्यभावे शरण गेलो, की मग हे वास्तव सहज भावाने स्वीकारता येते.

देहे रक्षणा कारणे यज्ञ केला ।

येथे समर्थ 'यज्ञ' असा शब्द योजतात. यज्ञ म्हणजे प्रयत्न. जीव या देहाच्या सदैव रक्षणासाठी कार्यरत राहतो. चिंता करतो.

पृथ्वीवरील सर्वांत शहाणा जीव मानव समजला जातो. आपल्या बुद्धीच्या जोरावर मानव निसर्गाला अंकित करू पाहतो. परंतु शेवटी पंचमहाभूतांच्या विराट शक्तीपुढे, काळाच्या पुढे त्याचे काही चालत नाही. त्याला शरणागती पत्करावी लागते. तेव्हा या दुर्लभ देहाचे पुढे काय होईल? याची चिंता न करता नामस्मरणाच्या मार्गाने भवाची म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घेता येते.

विवेकी, जाणत्या पुरुषांना हे शक्य होते. या आशयाचे एक सद्गुरू वचन आहे.

**दुर्लभ शरीरी दुर्लभ आयुष्य ।**
**याचा करू नये नास ।**
**दास म्हणे सावकाश ।**
**विवेक पहावा ॥**
**देहे सकळा मधे उत्तमु ।**
**देही राहिला आत्मारामु L**
**सकळा घटी पुरुषोत्तमु ।**
**विवेकी जाणती ॥**
**तेव्हा समर्थ मनाला सावध करतात.**
**या कारणे सावधान असावे**
**जितुके होईल तितुके करावे ।**

### वाचकांकडून उत्स्फूर्त प्रतिक्रिया

'मना सज्जना' या सदराने म्हणता-म्हणता आता २५ भागांचा टप्पा गाठला आहे. दर रविवारी या माध्यमातून आपली भेट होतच आहे. त्यात वाचकांकडून उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त होत या मालिकेचे स्वागत केले जात आहे. त्याचबरोबर समर्थ सेवक, साधक यांनीही प्रत्यक्ष भेटून, मोबाईलद्वारे संपर्क साधून चर्चा करून काही मौलिक सूचना केल्या. त्यातूनच खऱ्या अर्थाने सदर पुढे जात आहे. असो. समर्थ सद्गुरू आणि प्रभू श्रीरामचंद्र यांचे स्मरण आपण सदैव ठेवूया.

**भगवत कीर्तीने भरावे ।**
**भूमंडळ ॥**

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

**- भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : 94203 89541**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)